सत्ताबाजार

वर्षभरानंतर शिंदे सरकारमध्ये महिलेला संधी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात तब्बल वर्षभरानंतर रविवारी महिलेला स्थान मिळाले आहे. राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे यांची रविवारी मंत्रिमंडळात वर्णी लागल्यामुळे भाजप, शिवसेनेने नाही मात्र राष्ट्रवादीमुळे मंत्रिमंडळातील अनुशेष भरून निघाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात मात्र एकाही महिलेला संधी मिळाली नव्हती. भाजपमध्ये अनेक अनुभवी महिला आमदार असतानाही त्यांना मंत्रिमंडळात संधी मिळालेली नव्हती. आदिती तटकरे यांच्यामुळे महिलेला मंत्रिमंडळात स्थान मिळाले आहे.

“ भाजपने ज्या प्रकारे महाराष्ट्रात वारंवार जनादेश कमकुवत केला आहे, त्याचा निषेध करण्यासाठी शब्द नाहीत. केवळ लोकशाहीची हत्याच केली नाही तर, असे वाईट कृत्य लपवण्यासाठी राष्ट्रगीताचा उपयोग करण्यात येत आहे. - **महबूबा मुफ्ती**, अध्यक्ष, पीडीपी

कोण, कोणाच्या बाजूला अजून गुलदस्त्यातच

राष्ट्रवादीतील फुटीनंतर मराठवाड्यातील नेते मुंबईत

विशेष प्रतिनिधी, लोकसत्ता

छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यात शरद पवार यांना मानणारा मतदार मोठा असल्यामुळे राजकीय दिशा आणि त्याचे संदेश देण्याची भूमी म्हणून शरद पवारांनी मराठवाड्यात बांधणी केली ती सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून. मोदी लाटेत अनेक सहकारी सोडून गेलेले असतानाही मराठवाड्यात आठ विधानसभा सदस्य तर दोन विधान परिषद सदस्य निवडून आले. फौजिया खान राज्यसभेत राष्ट्रवादीचे प्रतिनिधित्व करतात.

आठ आमदार आणि एक खासदार अशी राजकीय ताकद मराठवाड्यात दिसत असली तरी बीड जिल्ह्यात ती एकवटलेली. धनंजय मुंडे, बाळासाहेब आसबे, संदीप क्षीरसागर, प्रकाश सोळंके असे चार आमदार. त्यातील धनंजय मुंडे यांनी रविवारी मंत्री पदाची शपथ घेतली. प्रकाश सोळंके मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या निवडणुकीमध्ये रविवारी व्यस्त होते. राष्ट्रवादीतील फाटाफुटीच्या बातम्या आल्यानंतर ते आणि पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. या दोन्ही आमदारांना मंत्री पदाची इच्छा होती. मात्र, ते रविवारच्या राजकीय घडामोडीपासून दुपारपर्यंत अनभिज्ञ होते. प्रकाश सोळंके यांनी तर अलीकडेच बीआरएस पक्षाच्या कामाचेही जाहीर कौतुक केले होते. हिंगोलीतील राजू नवघरे हेही मुंबईत असून त्यांनी त्यांचा राजकीय निर्णय घ्यावा असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे अद्यापि त्यांचा कल कळू शकला नव्हता. मात्र, हिंगोलीतील राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते जयप्रकाश दांडेगावकर यांनी आम्ही शरद पवार यांच्याबरोबरच राहणार असे निसंदिग्धपणे ‘ लोकसत्ता’ शी बोलताना सांगितले. जालना जिल्ह्यातील घनसावंगी मतदारसंघाचे आमदार राजेश टोपेही रविवारी मतदारसंघातच होते. त्यांनी सहकारी साखर कारखान्याच्या बैठकाही घेतल्या. मात्र, ते अजित पवारांच्या बाजूला की शरद पवार यांच्या समवेत हे कळू शकले नाही. लातूर जिल्ह्यात संजय बनसोडे हे ‘दादानिष्ठ’ म्हणूनच ओळखले जात असल्याने त्यांनी रविवारी शपथ घेतली. शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे हे मात्र अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताना हजर होते.

मराठवाड्यातील राष्ट्रवादीची ताकद किती?

औरंगाबाद, उस्मानाबाद, परभणी व नांदेड या चार जिल्ह्यांत राष्ट्रवादीचे लोकप्रतिनिधी नाहीत. हिंगाली जिल्ह्यात राजू नवघरे हे एकमेव आमदार. लातूर जिल्ह्यातील उदगीर मतदारसंघाचे आमदार संजय बनसोडे आणि अहमदपूरचे बाबासाहेब पाटील हे दोन्ही आमदार अजित पवार यांच्या बाजूला सरकले. जालन्यातून राजेश टोपे आणि बीडमधील चार आमदारांच्या भूमिका अद्यापि गुलदस्त्यातच आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी रविवारी मुंबईत अजित पवार व मंत्रिमंडळात सामील झालेल्या नेत्यांविरोधात घोषणाबाजी केली.

पश्चिम महाराष्ट्रात राष्ट्रवादीत फूट

लोकसत्ता प्रतिनिधी

कोल्हापूर : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी शिंदे- फडणवीस सरकारमध्ये सहभागी होऊन पुन्हा उपमुख्यमंत्रिपद पटकावल्यानंतर त्याचे पडसाद पश्चिम महाराष्ट्रात उमटले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या पश्चिम महाराष्ट्रात निम्मे आमदार, जिल्हाध्यक्ष यांनी शरद पवार यांच्याबरोबर राहण्याचा निर्णय घेतला आहे. या भागात या घटनेमुळे चलबिचल निर्माण झाली असून भाजपमध्येही अस्वस्थता पसरली आहे.

कोल्हापूरला मंत्रिपद

कोल्हापूर जिल्ह्यात हसन मुश्रीफ यांनी अजित पवार यांना पाठबळ देत मंत्रिपदाची शपथही घेतली. दुसरे आमदार राजेश पाटील यांनीही हाच मार्ग पत्करला आहे. कोल्हापूर महानगर अध्यक्ष आर. के. पोवार, उद्योजक व्ही. बी. पाटील, सरचिटणीस मदन कारंडे आदींनी शरद पवार यांच्याबरोबर असल्याचे स्पष्ट केले आहे.

सांगलीत शरदनिष्ठा

सांगली जिल्ह्यामध्ये प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शरद पवार यांच्याबरोबर असल्याचे स्पष्ट केले आहे. आमदार सुमन पाटील यांनी शरद पवार यांच्याबरोबर राहणार असल्याचे संकेत दिले. आमदार मानसिंगराव नाईक, आमदार अरुण लाड यांनी प्रतीक्षा करण्याचे ठरवले आहे.

सोलापुरात फटका

बबनराव शिंदे, संजय शिंदे, यशवंत माने या तिन्ही आमदारांनी अजित पवार यांच्यासोबत जाण्याचे संकेत दिले आहेत.

साताऱ्यात समसमान

रामराजे निंबाळकर, दीपक चव्हाण, मकरंद पाटील या आमदारांनी अजितदादांना समर्थन दिले. खासदार श्रीनिवास पाटील, आमदार शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील यांनी शरद पवार यांना साथ दिली . शरद पवार उद्या कराडमध्ये येणार असल्याने स्वागताची तयारी करण्यात आली आहे.

LIC भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

भारतीय आयुर्विमा महामंडळ, नाशिक विभागीय कार्यालय

जीवन प्रकाश, गडकरी चौक, विपणन प्रबंधक, विक्रय विभाग, नाशिक-४२२००२. फोन: (०२५३) २५७४५९४/२३१३७१९. ईमेल: sales.nashik@licindia.com

वर निर्दिष्ट कार्यालय विविध प्रकारच्या भेटवस्तू, गृहोपयोगी वस्तू, किचन उत्पादने, चादरी, बेडशीटस्, ब्लँकेटस् व विविध प्रकारच्या बॅग्ज् इ. तसेच सोने, चांदीचा मुलामा दिलेल्या भेटवस्तू, रेडिमेड गारमेंटस्, टी शर्टस्, नामांकित कंपन्यांचे फॅब्रिक मटेरियल, ट्रॉफिज् व मानचिन्हे, छत्री, रेनकोट, घड्याळे, विविध इलेक्ट्रॉनिक वस्तू, सोने-चांदीचे विविध ग्रॅम वजनातील नाणी यांचे पुरवठादार तसेच विविध फॉर्मस्, माहितीपत्रके, फ्लेक्स, बॅनर्स प्रिंट करणारे, होर्डींग जाहिरातदार, पब्लिसिटी व्हॅन कंत्राटदार यांची अधिकृत नोंदणी सूची (पॅनल) बनविणेबाबत विहित नमुन्यात अर्ज मागवित आहे. तरी इच्छुकांनी दिनांक **१२ जुलै २०२३** च्या आत वर निर्दिष्ट कार्यालयीन पत्त्यावर येऊन अर्ज घेऊन जावे.

सर्व बाबींची पूर्तता केलेले विहित नमुन्यातील अर्ज व सोबतचे अत्यावश्यक कागदपत्रे मोहोरबंद लिफाफ्यात (पाकिटात), मार्केटींग मॅनेजर, विक्रय विभाग, जीवनप्रकाश बिल्डिंग, गडकरी चौक, नाशिक या पत्त्यावर **२७ जुलै २०२३** पर्यंत प्रत्यक्ष जमा करावेत.

उपरोक्त दिलेल्या तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील सर्व प्रक्रियेबाबत आयुर्विमा महामंडळ, नाशिक आपला अंतिम अधिकार राखून ठेवीत आहे.

स्थळ: नाशिक.
वरिष्ठ विभागीय अधिकारी, नाशिक

MUKHYA MANTRI GRAM SADAK YOJANA - II (MMGSY – II)

e-Procurement Notice

TENDER Notice No. 24 /2023-24 (2nd Call)

THE Superintending Engineer, PMGSY, Konkan Region, Thane on behalf of Government of Maharashtra invites the bids on percentage rate basis in electronic tendering system for construction of road under Mukhya Mantri Gram Sadak Yojana -II in the district of Ratnagiri in One package for 17.885 **km** length with Construction cost **Rs. 1028.43 Lacs** & cost of maintenance **Rs.95.63 lacs** towards their maintenance for five years from the eligible contractors registered with Govt. of Maharashtra, in *Public works department / Rural Development Department in appropriate class.
Date of release of Invitation for Bids through e-procurement: 30/06/2023.

Availability of Bid Documents and mode of submission : The bid document is available online and should be submitted online in https://mahatenders.gov.in. The bidder would be required to register in the web-site which is free of cost. For submission of the bids, the bidder is required to have a valid Digital Signature Certificate (DSC) from one of the authorized Certifying Authorities.

Last Date / Time for receipt of bids through e-procurement: 11/07/2023 upto 17.00 hours.

For further details please log on to https://mahatenders.gov.in

Sd/-
(Tushar A. Burud)
Superintending Engineer
Pradhan Mantri Gram Sadak Yojana
Konkan Region, Thane

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्य कार्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, चिखली, ता. चिखली, जि. बुलढाणा-४४३२०१

स्थावर मालमत्तेची जाहीर लिलावाद्वारे विक्री नोटीस V

दि सेक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ॲक्ट ऑफ फायनांशिअल ॲसेटस ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी ॲक्ट २००२ चे कलम १३ (१२) व सेक्युरिटी इंटरेस्ट इन्फोर्समेंट रूल्स २००२ अंतर्गत.

ज्या अर्थी **मे. अष्टविनायक कन्स्ट्रक्शन प्रोजेक्ट प्रा. लि., औरंगाबाद** यांनी दि चिखली अर्बन को ऑप बँक लि. चिखली, शाखा वाळुज, औरंगाबाद यांचे कडून **स्थावर मालमत्ता तारण कर्ज रू ६,१७,४१,०००/-** घेतले आहे आणि त्या कर्जाच्या परत फेडी करीता हमी म्हणुन कर्जदार व जमानतदार यांच्या मालकीची खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता बँकेकडे गहाण म्हणुन दिली असुन बँकेने नोटीसेस पाठवूनही कर्जदार यांनी थकीत रकमेचा भरणा मुदतीचे आत केला नाही म्हणुन तारण गहान असलेल्या स्थावर मालमत्तेपैकी खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेचा बँकेतर्फे प्राधिकृत अधिकारी यांनी **दिनांक ११/१०/२०२२ व दिनांक १२/१०/२०२२ रोजी ताबा** घेतला आहे.

दि सेक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ॲक्ट ऑफ फायनांशिअल ॲसेटस ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी ॲक्ट २००२ चे कलम १३ (१२) व सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स २००२ चे कलम ८.९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारावरून थकीत **कर्ज रू ७,०९,७२,१७७/-** अधिक **दिनांक ०१/०७/२०२३** पासुनचे घेणे व्याज व खर्चासह येणे बाकी असलेल्या रकमेच्या वसुली करीता खालील सही करणार प्राधिकृत अधिकारी खालील वर्णनाचे गहाण स्थावर मालमत्ता आहे त्या स्थितीत जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्या करीता नोटीस देत आहे.

खालील गहाण स्थावर मालमत्तेचा स्थावर मालमत्ता ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी आणि ज्या परिस्थितीत आहे तशीच विक्री जाहीर लिलावाव्दारे **दिनांक २०/०७/२०२३** रोजी दुपारी **ठिक १२.३० वाजता** बँकेचे मुख्य कार्यालय चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा येथे ठेवली आहे. ज्या कोणास खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता विकत घ्यावयाची असेल त्यांनी राखीव किमंतीच्या १० टक्के अनामत रक्कम लिलावा पूर्वी जमा करावी.

ज्या खरेदीदाराच्या नावे विक्री मंजुर होईल त्या खरेदीदारास खरेदी रकमेच्या २५ टक्के रक्कम २४ तासाच्या आत जमा करावी लागेल व बाकी राहीलेली ७५ टक्के रक्कम विक्री मंजुरीचे तारखे पासून १५ दिवसाचे आत जमा करावी लागेल. बँकेचे संचालक मंडळाच्या परवानगीने सदर रक्कम भरणा करण्यास मुदत वाढ देणे बाबत विचार केला जाईल. खरेदीदाराने दिलेल्या मुदतीत रक्कम जमा न केल्यास खरेदीदाराने जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल. विक्री कायम केल्यानंतर व पूर्ण रकमेचा भरणा केल्यानंतर बँकेतर्फे बँकेचे प्राधिकृत अधिकारी परिशिष्ट ५ मधे दिलेल्या नमुन्यात विक्री प्रमाणपत्र (सेल सर्टिफीकेट) खरेदीदाराचे नावाने करून देतील त्यासाठी येणारा संपूर्ण खर्च खरेदीदाराला करावा लागेल.

● स्थावर मालमत्तेचे वर्णन ●

मालमत्ता धारकाचे नाव : १) श्री. भागीनाथ आसाराम साळे यांच्या मालकीची मे. अष्टविनायक कन्स्ट्रक्शन प्रोजेक्ट प्रा. लि. यांनी विकसन करारनाम्यानुसार तारण दिलेली मालमत्ता मौजे तिसगांव वाळुज महानगर औरंगाबाद येथील गट क्र. १४५ मधील ६८.७५ आर मे. अष्टविनायक पार्क (C) सी विंग मधील विकसन करारनाम्यानुसार ५५ टक्के हिस्सा म्हणजे 1-BHK फ्लॅट नं.४, ६, ११, १२, १३, १०४, १०५, १११, ११२, ११३, ११४, २०४, २०५, २०६, २०७, २११, २१२, २१३, २१४, ३०६, ३०७ व 1-RK फ्लॅट नं.१५, १६, ११५, ११६, ११७, २१५, २१६, २१७ व ३१५ असे एकुण ३० फ्लॅट ज्याचे एकुण बांधकाम क्षेत्र २४२२.७० चौ. मी. बांधकामासह.

स्थावर मालमत्तेची राखीव किंमत रू २,०४,७५,२००/-

अनामत रक्कम रू. २०,४७,५२०/-

२) श्री. राधेश्याम ज्ञानबाराव डव्हळे मौजे गणेशवाडी हिंगोली, ता.जि. हिंगोली येथील महावीरनगर, सर्व्हे नं. ७/१ ते ७/५ मधील प्लॉट नं. ५९ व ६० वर बांधलेल्या रोहाऊस मधील नं. ३ चे क्षेत्रफळ ७६.६८ चौ.मी. रोहाऊस नं. ४ चे क्षेत्रफळ ७६.६८ चौ.मी. त्यावरील बांधकामासह.

स्थावर मालमत्तेची राखीव किंमत रू ३५,५०,०००/-

अनामत रक्कम रू. ३,५५,०००/-

विक्रीच्या अटी व शर्ती बँकेच्या शाखा कार्यालय, वाळूज, औरंगाबाद व मुख्य कार्यालय, चिखली येथे पाहावयास मिळतील. बँकेने कोणतेही कारण न दाखवता विक्री कायम करणे, स्थगित करणे किंवा रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे.

मुख्य कार्यालय, चिखली — **(यु.टी. पसारकर) प्राधिकृत अधिकारी**
दिनांक : ०१/०७/२०२३ — **दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि., चिखली**

SHRIRAM Finance — श्रीराम फायनान्स लिमिटेड

- नोंदणीकृत कार्यालय:- श्री टॉवर, प्लॉट नं. १४ अ, साऊथ फेझ, इंडस्ट्रियल इस्टेट, गुणिंदी, चेन्नई ६०००३२.
- प्रशासकीय कार्यालय :- ऑफिस नं – ४०६, ४०७ ४था मजला प्लॉट नं – ४८, निको चेम्बर्स, सेक्टर ११,सि.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४.
- शाखा कार्यालय :- शाखा कार्यालय :- धनंजय गायकवाड सावरकर चौक, समर्थ गणेश मंदीर नवळ, समर्थ कॉम्प्लेक्स, गायकवाड बिल्डींग २ आणि ३ सिटी सर्व्हे नं. ३९१७, उस्मानाबाद ४१३५०१

ताबा सुचना

(नियम ८ (१)नुसार

अर्थी श्रीराम फायनान्स लिमिटेड अधिकृत अधिकारी यांनी सेक्युरिटायझेशन अॅड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिल अॅसेट्स अॅड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ आणि कलम १३ (२) च्या प्राप्त अधिकाराने व सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट रुल्स २००२ च्या) रु ८ प्रमाणे मागणी नोटीस दिनांक : १०/१२/२०२२ रोजी **१. विवेक विष्णु गपाट (कर्जदार / गहाणखत - १) २. विष्णु शामराव गपाट (जामीनदार - २ / गहाणखत - २) ३. सुबोध श्रीरंग सुरवसे (जामीनदार - ३)** (कर्जखाते कं. CDOSMTF1703090002) यांनी दिली होती की, त्यांनी - देय रक्कम रु ८३९०५३४/- (अक्षरी त्र्यांशी लाख नव्वद हजार पाचशे चौतीस रुपये) व तेथून पुढे होणारे व्याज व इतर सदरची नोटीस मिळताच ६० दिवसाचे आत श्रीराम फायनान्स लिमिटेड शाखा उस्मानाबाद येथे भरावी.

उपरोक्त उल्लेखीलेल्याप्रमाणे सदर नोटीस मिळाल्यानंतर ६० दिवसांचे आत **१. विवेक विष्णु गपाट (कर्जदार / गहाणखत - १) २. विष्णु शामराव गपाट (जामीनदार - २ / गहाणखत २) ३. सुबोध श्रीरंग सुरवसे (जामीनदार ३)** हे संपुर्ण रक्कम भरु न शकल्याने खालील सही करणार अधिकृत अधिकारी यांनी खालील परिशिष्टामध्ये नमुद मिळकतीचा कलम १३ (४) व रुल ८ ऑफ सेक्युरिटायझेशन अॅड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिल अॅसेट्स अॅड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट - २००२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार दिनाक : २६/०६/२०२३ रोजी ताबा घेतला आहे. अशी नोटीस कर्जदार, सह कर्जदार जामीणदार गहाणखत करून देणार व तमाम जनतेस देण्यात येत आहे. तसेच या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कोणीही खालील परिशिष्टात उल्लेख केलेल्या स्थावर मिळकतीबाबत वर नमुद केलेल्या कर्जदार, गहाणखत करून देणार यांचे बरोबर अथवा इतर कोणाबरोबरही कोणत्याही प्रकारे व्यवहार करु नये, कारण सदर मिळकत ही श्रीराम फायनान्स लिमिटेड, शाखा उस्मानाबाद. यांचेकडे वर उल्लेखलेल्या कर्ज रक्कम व त्यावरील व्याजापोटी तारण ठेवली आहे.

गहाण / तारण मालमत्तेचे वर्णन

मिळकतीचे वर्णन :- डि व सबडि उस्मानाबाद, तालुका उस्मानाबाद येथील घर जागा यांसी सर्व्हे नं. १६५ / १ नवीन सिटी सर्व्हे नं. ५४८० यांसी मालमत्ता कं. २६ / ३४३ यासी क्षेत्र १९५.०० चौ.मी. उस्मानाबाद नगर परिषद मधील मिळमत यांसी चतु:सिमा
पुर्वेस : सर्व्हे नं. १६५,
दक्षिणेस: रोड,
पश्चिमेस : सर्व्हे नं. १६५,
उत्तरेस : सर्व्हे नं. १६६

१. सदर अनामत मालमत्ता सोडवुन घेण्यासाठी उपलब्ध असणा-या वेळेच्या संदर्भात कर्जदाराचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद १३ मधील उप विभाग (८) कडे वेधण्यात येते.
२. कोणतीही शंका असल्यास किंवा समझोता करायचा असल्यास संपर्क साधावा, श्री. अनिस शेख मो.क्रं. ८८८८१८०००८, श्री. आनंद काटवे मो. क्रं. ९८९००१४५३४. प्राधिकृत अधिकारी:- श्री संदीप जवळेकर मो. क्रं. ७०२०७३५८९७, श्रीराम फायनान्स लिमिटेड.

दिनांक :- २६/०६/२०२३
ठिकाण :- उस्मानाबाद

सही /-
प्राधिकृत अधिकारी
श्रीराम फायनान्स लिमिटेड.

बोरोसिल लिमिटेड

CIN: L36100MH2010PLC292722
नोंदणीकृत कार्यालय : ११०१, ११ वा मजला, क्रीसेन्झो, जी-ब्लॉक, एमसीए क्लब समोर, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१.
फोन क्र. : ०२२-६७४०६३०० **फॅक्स क्र. :** ०२२-६७४०६५१४
वेबसाईट : www.borosil.com, ई-मेल: bl.secretarial@borosil.com

१३ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

कंपनीची, **१३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम")**, बोलाविण्याच्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या विषयावर विचार करण्यासाठी कंपनी व्यवहार मंत्रालय ("एमसीए") आणि भारतीय प्रतिभूती विनिमय बोर्ड ("सेबी") ह्यांच्याद्वारे जारी करण्यात आलेल्या लागू असलेल्या परीपत्रकांच्या सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा २०१३ आणि त्याअंतर्गत करण्यात आलेली नियमावली आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय बोर्डाच्या (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिस्क्लोसर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ च्या सर्व लागू असलेल्या तरतुदींच्या अनुपालनार्थ **मंगळवार, जुलै २५, २०२३ रोजी दुपारी ०२:०० वाजता (भाप्रवे)** व्हिडियो कॉन्फरसिंग ("व्हीसी") सुविधाद्वारे एजीएम निश्चित करण्यात आली आहे.

आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी वार्षिक अहवाल (एजीएम सूचनेसह) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सर्व अशा भागधारकांना (जून २३, २०२३ पर्यंत शेअर्सधारण केले आहेत) पाठविण्यात आली आहे ज्यांच्या ई-मेल आयडीची नोंद रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट/ डिपॉझिटरीज ह्यांच्याकडे केली आहे. सूचनेसह नमूद वार्षिक अहवाल कंपनीच्या www.borosil.com ह्या संकेतस्थळावर आणि बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com ह्या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. एजीएमची सूचना नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("एनएसडीएल") च्या www.evoting.nsdl.com या सर्केतस्थळावर उपलब्ध आहे, व्हीसी आणि ई-व्होटिंग सुविधेसाठी (म्हणजे रिमोट व्होटिंग आणि एजीएम दरम्यान ई-व्होटिंगसाठी) कंपनीने नियुक्त केलेली एजन्सी आहे.

ई-व्होटिंगद्वारे मत(ते) दान करण्याचे आणि व्हीसी द्वारे एजीएममध्ये हजर राहण्याचे स्वरूप :
कंपनी त्यांच्या भागधारकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे म्हणजेच ई-व्होटिंग मतदानाचा अधिकार बजावता यावा ह्यासाठी ई-व्होटिंग सुविधा तरतूद करण्यात आली आहे. ई-व्होटिंग आणि व्हीसीद्वारे एजीएमला हजर राहण्याची प्रक्रिया सूचनेच्या टिपा ह्या भागामध्ये देण्यात आली आहे. रिमोट ई-व्होटिंग कालावधी आणि ई-व्होटिंगसाठी लॉग इन आणि एजीएमला हजर राहण्याचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:

ईव्हीईएन	१२४३२१
ई-व्होटिंगसाठी आणि एजीएमला हजर राहण्यासाठी पात्रता निश्चित करण्यासाठी कट ऑफ दिनांक	**मंगळवार, जुलै १८, २०२३**
रिमोट ई - व्होटिंगची सुरवात	**शुक्रवार, जुलै २१, २०२३ (स. ०९:०० वा. भाप्रवे)**
रिमोट ई - व्होटिंग समाप्ती	**सोमवार, जुलै २४, २०२३ (सायं. ०५:०० वा. भाप्रवे)**
युजर आयडी आणि पासवर्ड	नोटीसमध्ये तपशीलवार प्रकिया आणि सूचना नमूद केल्या आहेत.

टिप : उपरोक्त नमूद दिनांक आणि वेळेनंतर रिमोट ई-व्होटिंग करता येणार नाही.

ज्या व्यक्तींची नावे कट ऑफ दिनांकाच्या अनुसार सभासदांची नोंदवही आणि रजिस्ट्रार आणि ट्रान्स्फर एजंट/डिपॉझिटरीज ह्यांच्या द्वारे राखल्या जाणाऱ्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीमध्ये आली आहेत केवळ तेच ई-व्होटिंग सुविधेचा वापर करण्यासाठी आणि एजीएमला हजर राहण्यास पात्र असतील. मतदानाचे अधिकार कट ऑफ दिनांकानुसार कंपनीच्या भरणा केलेल्या भाग भांडवलामध्ये त्याच्या/तिच्या/त्यांच्या भाग धारणेच्या प्रमाणामध्ये निश्चित करण्यात येईल. व्यक्ती जी कट ऑफ दिनांकानुसार कंपनीची सभासद नाही त्यांनी सदर सूचना केवळ त्यांच्या माहितीसाठी असल्याचे समजावे. कोणीही व्यक्ती जे **जून २३, २०२३** नंतर भागधारक झाले आहेत आणि ज्यांनी कट ऑफ दिनांकानुसार भाग धारणा केली आहे त्यांना सूचनेमध्ये देण्यात आलेल्या प्रक्रियेचे पालन करून ई-व्होटिंगद्वारे त्यांच्या मतदानाचा अधिकार बजावता येईल आणि एजीएमला हजर राहता येईल. भागधारक ज्यांनी प्रत्यक्ष स्वरूपात भाग धारणा केली आहे किंवा ज्यांनी त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद केलेली नाही त्यांनादेखील सूचनेमध्ये देण्यात आलेल्या प्रक्रियेचे पालन करून ई-व्होटिंगद्वारे त्यांच्या मतदानाचा अधिकार बजावता येईल आणि एजीएमला हजर राहता येईल.

एजीएमला हजर असलेले भागधारक ज्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे ह्यापूर्वी मतदान केलेले नाही ते एजीएमदरम्यान त्यांचे मतदान ई-व्होटिंगद्वारे करण्यास पात्र असतील. भागधारक ज्यांनी त्यांचे मतदान रिमोट ई-व्होटिंगद्वारे केले आहे त्यांना एजीएमला हजर राहता येईल परंतु ते परत मतदान करण्यास पात्र नसतील. केवळ असे भागधारक जे व्हीसीद्वारे एजीएमला हजर आहेत आणि ज्यांनी त्यांचे मतदान रिमोट ई-व्होटिंगद्वारे केलेले नाही ते एजीएमदरम्यान उपलब्ध असलेल्या ई-व्होटिंग सिस्टीमद्वारे मतदान करण्यास पात्र असतील. जर भागधारकाद्वारे एजीएमदरम्यान उपलब्ध असलेल्या ई-व्होटिंग सिस्टीमद्वारे कोणतेही मतदान झाले असल्यास आणि तोच मतदार व्हीसीद्वारे एजीएममध्ये सहभागी झाला नसल्यास, अशा सभासदाद्वारे झालेले मतदान वैध समजले जाणार नाही. भागधारकाद्वारे ठरावावर एकदा मतदान करण्यात आल्यानंतर भागधारकाला परत ते बदलता येणार नाही.

एनएसडीएल ई-व्होटिंग सिस्टम संबंधित सर्व समस्या/तक्रारी ह्यासंदर्भात श्री. अनुभव सक्सेना, सहा. व्यवस्थापक, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड, ट्रेड वर्ल्ड, 'ए' विंग, ४ था मजला, कमला मिल्स कंपाउंड, सेनापती बापट मार्ग, लोवर परेल, मुंबई - ४०००१३ येथे किंवा ई - मेल evoting@nsdl.co.in वर मेल करावे किंवा ०२२ ४८८६७००० आणि ०२२ २४९९७००० ह्या नंबरवर कॉल करावे.

ई-मेल आयडी, बँक खाते तपशिल इत्यादी नोंदविण्याचे / अपडेट करण्याचे स्वरूप :

१. भागधारक ज्यांनी प्रत्यक्ष स्वरूपात भाग धारणा केली आहे त्यांना केवायसी तपशील जसे पॅन (आधारशी संलग्न), उत्तराधिकारी तपशिल, संपर्क तपशिल (पिनकोडसह पत्ता, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी) बँक खाते तपशिल (बँकेचे नाव, शाखेचे नाव, खाते क्रमांक आणि आयएफएस कोड) आणि सहीचा नमुना कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट ("आरटीए"), युनिवर्सल कॅपिटल सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड ह्यांच्याकडे सादर करण्याची विनंती करण्यात येत आहे. उपरोक्त माहिती उपलब्ध करून देण्यासाठी सेबीद्वारे विहित करण्यात आलेले संबंधित अर्ज कंपनीचे संकेतस्थळ www.borosil.com वर तसेच आरटीएचे संकेतस्थळ www.unisec.in. वर देखील उपलब्ध आहेत. उपरोक्त नमूद अर्ज सादर करण्याच्या संदर्भात भागधारक आरटीएला (०२२) ४९१८६१७८-७९ वर संपर्क करू शकतात किंवा bl@unisec.in.वर ई-मेल करू शकतात.
२. अप्रत्यक्ष स्वरूपामध्ये भाग धारणा करणाऱ्या भागधारकांना केवायसी तपशील जसे पॅन (आधारशी संलग्न), उत्तराधिकारी तपशिल, संपर्क तपशिल (पिनकोडसह पत्ता, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी), बँक खाते तपशिल (बँकेचे नाव, शाखेचे नाव, खाते क्रमांक आणि आयएफएस कोड) आणि सहीचा नमुना संबंधित डिपॉझिटरी सहभागींसोबत नोंदणी/अपडेट करण्याची विनंती करण्यात येत आहे.

बोरोसिल लिमिटेड करीता

दिनांक: जुलै ०२, २०२३
ठिकाण: मुंबई

अंशु अगरवाल
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

Classifieds

नोकरीविषयक

आयुर्वेदिक कंपनीला शिक्षित / बेरोजगार महिला, पुरूष पाहिजेत. घरीबसून औषध पॅकिंग करून दरमहा २५०००-३००००/- कमवा. (रजिस्ट्रेशन शुल्क २१५०/-) संपर्क. 9777752472

0070848250-1

स्थावर मालमत्ता?

तुमच्या अपेक्षेप्रमाणे व्यवहार होण्यासाठी ‘लोकसत्ता’त एक छोटी जाहिरात पुरेशी आहे!

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाईझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींशीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातींतील आशयासाठी द इंडियन एक्सप्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याशीबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

POONAWALLA HOUSING FINANCE — Apna Ghar, Apni Pehchan

पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

(पूर्वीची मॅग्मा हाऊसिंग फायनान्स लि.)
नोंदणीकृत कार्यालय : ६०२, सहावा मजला, झिरो वन आयटी पार्क, स. क्र. ७९/१, घोरपडी, मुंढवा रोड, पुणे-४११०३६.
शाखा कार्यालय : दुसरा मजला, पूनम चेंबर्स, पीएनबीच्या वर, नवी पेठ, जळगाव, महाराष्ट्र - ४२५००१

ई-लिलाव- विक्री सूचना

सर्फेसी अधिनियमांतर्गत अनामत अचल मत्तेची विक्री

याद्वारे कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की खाली नमूद मालमत्ता सर्टिफिकेट ऑफ इनकॉर्पोरेशन अन्वये पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड असे नाव देण्यात आलेल्या पूर्वीच्या मॅग्मा हाऊसिंग फायनान्स लि. कडे तारण असून सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(४)/ १४ अंतर्गत त्यांचा कंपनीच्या संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताबा घेतलेला असून तिची कंपनीच्या थकबाकीच्या तसेच लागू व्याज, खर्च व शुल्के इ. च्या वसुलीसाठी खाली नमूद अटी व शर्तींनुसार ई-लिलावाच्या माध्यमातून विक्री करण्यात येईल. सदर मालमत्तेची विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ८ व ९ अंतर्गत ''जशी आहे जेथे आहे, तेथे जे काही आहे आणि उपाय नाही'' तत्त्वावर करण्यात येत आहे.
विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशिलासाठी कृपया पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर म्हणजे www.poonawallahousing.com येथे दिलेली लिंक पाहावी.

प्रस्ताव क्र. ग्राहकाचे नाव {ए}	मागणी सूचना दिनांक आणि थकबाकी रक्कम {बी}	ताब्याचा प्रकार {सी}	मालमत्तेचा तपशील {डी}	आरक्षित किंमत {ई}	बयाणा रक्कम (आ. कि.च्या १०%) {एफ}	बयाणा रक्कम प्रस्तुतीकरण दिनांक (जी)	बोली वृद्धी {एच}	मालमत्ता पाहणीचा दिनांक आणि वेळ {आय}	लिलाव दिनांक आणि वेळ {जे}	असल्यास ज्ञात बोजे/ न्यायालयीन खटले {के}
कर्ज क्र. HL/0117/H/14/100134 आणि HL/0117/H/14/100120 शारदा प्रमोद वर्मा (कर्जदार) चेतन सराफ (सह-कर्जदार)	सूचना दिनांकः १९.०१.२०२२, १९.०१.२०२२ रोजी देय रु. ५५५९११६.०० (रुपये पंचावन्न लक्ष एकोणसाठ हजार एकशे सोळा फक्त) अधिक वसुलीच्या दिनांकापर्यंतचे वार्षिक १५.५% दराने व्याज. १९.०१.२०२२ रोजी देय रु. ३०१७१४.०० (रुपये तीन लक्ष एक हजार सातशे चौदा फक्त) अधिक वसुलीच्या दिनांकापर्यंतचे वार्षिक १३.०५% दराने व्याज	प्रत्यक्ष	जमिनीवर बांधकाम असलेली तारण मालमत्ता, सी.टी.एस क्र. ८६९, सराफ बाजार, चाळीसगाव, तालुका चाळीसगाव, चाळीसगाव नगर परिषदेच्या हद्दीत, जि. जळगाव, चाळीसगाव, पिन - ४२४१०१.	रु. ५१,८०,६५८/- (रुपये एक्कावन्न लक्ष ऐंशी हजार सहाशे अठ्ठावन्न फक्त)	रु. ५,१८,०६५.८/- (रुपये पाच लक्ष अठरा हजार पासष्ट आणि ऐंशी पैसे फक्त)	०३.०८.२०२३ सायं. ५ वाजेपर्यंत	१०,०००/-	२८.०७.२०२३ (स.११- दु.४)	०४.०८.२०२३ (स.११- दु.२)	निरंक

''अधिक चौकशीसाठी किंवा सहाय्यासाठी कृपया श्री. शादाब अख्तर यांचेशी संपर्क साधावा (मोबाईल # +९१ ९९१०४५३४३४)''

इच्छुक बोलीदारांना/खरेदीदारांना विनंती आहे की त्यांनी शाखेस आणि लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेस भेट द्यावी आणि भार, बोजे इ. विषयी आवश्यक ती माहिती प्राप्त करावी. खरेदीदारांनी स्वतः चौकशी करावी आणि अतिरिक्त शुल्के, बोजे आणि तिसऱ्या पक्षाचे इतर हितसंबंध इ. बाबत माहिती घेऊन सर्व प्रकारे स्वतःची खात्री करून घ्यावी. यशस्वी बोलीदार/ संभाव्य खरेदीदाराने मालमत्तेशी संबंधित मालमत्ता कर, वीज बिलाची थकबाकी आणि असल्यास, इतर थकबाकी यांसारखी वैधानिक देणी इ. ची माहिती करून घ्यावी आणि त्यांचा भरणा करावा. इच्छुक बोलीदारांना ई-बोलीसाठी अनिवार्य असल्याप्रमाणे पोर्टलवर स्वतःची नोंदणी करावी लागेल आणि पुरेसा वेळ असताना लिलाव सेवा पुरवठादार मे. सी१ इंडिया प्रा. लि. पत्ता : प्लॉट क्र. ६८, तिसरा मजला, गुडगाव, हरयाणा-१२२००३. संपर्क क्रमांक- ७२९११९८१११२४,२५,२६ सपोर्ट ईमेल आयडी : Support@bankeauctions.com संपर्क व्यक्ती- विनोद चौहान, ईमेल आयडी- delhi@c1india.com संपर्क क्र.-९८१३८८७९३१ यांचेकडून लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करून घ्यावा लागेल. कृपया लक्षात घ्यावे की बोलीदार ई-लिलावाचे ऑनलाईन प्रशिक्षण केवळ त्यांचेकडूनच प्राप्त करू शकतात. इच्छुक खरेदीदार/ बोलीदारांना बयाणा रक्कम ''पूनावाला हाऊसिंग फायनान्स लि., बँक - आयसीआयसीआय बँक लि., खाते क्र. ०००६५१०००४६० आणि आयएफएससी कोड - ICIC0000006, २०, आर.एन. मुखर्जी रोड - कोलकाता - ७००००१ यांचे खात्यामध्ये कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा शेड्युल्ड बँकेच्या एनईएफटी/आरटीजीएस/डीडीच्या माध्यमातून दि. ०३.०८.२०२३ पर्यंत सादर करावी लागेल आणि आपले नाव https://www.bankeauctions.com येथे नोंदवून आपला आयडी व पासवर्ड निःशुल्क प्राप्त करून घ्यावा लागेल आणि सेवा पुरवठादाराकडून ई-लिलावाचे प्रशिक्षण प्राप्त करावे लागेल. वेबसाइटवर नोंदणी झाल्यानंतर इच्छुक खरेदीदारास/ बोलीदारास पुढील कागदपत्रांच्या स्वाक्षांकित प्रती अपलोड, ई-मेल कराव्या लागतील आणि त्यांच्या छापील प्रती प्राधिकृत अधिकारी श्री. तुषार स्वामी, पत्ता-६०२, सहावा मजला, झीरो वन आयटी पार्क, स.क्र. ७९/१, घोरपडी, मुंढवा रोड, पुणे-४११०३६ यांचेकडे पाठवाव्या लागतील. मोबाईल क्र. ९६७३८००२७७, ई-मेल आयडी tushar.swami@poonawallahousing.com

दिनांक: ०३.०७.२०२३
स्थान: जळगाव

प्राधिकृत अधिकारी
पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची मॅग्मा हाऊसिंग फायनान्स लि.)